Pune's Only Fortnightly For Women

# बिइंग वुमन

**आतील पानांत**


- फोर फौंटन डीस्ट्रेस स्पाच्या **रत्ना कुलकर्णी**
- ट्रेंडर्ड हॉलीडेजच्या संचालक **राधिका नवरे**
- पर्यावरण रक्षणातील आघाडीचे नाव **विनिता आपटे**
- स्ट्रेसला टाळा; निरोगी आयुष्य जगा **डॉ. नूपुर जोगळेकर**


Price Rs : 18/- Pages : 4, RNI No. MAHMAR/2019/78753 Pune Year : 3, Issue : 7, 1 To 15 March 2022 (Fortnightly)

**संपादकीय**

## महिला दिनाचे औचित्य...



**रोहिणी वांजपे**
संपादक

'बिइंग वुमन'च्या या नव्या स्वरूपातील अंकामध्ये सर्वांचे स्वागत आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने बिइंग वुमन नवीन स्वरूपात महिला दिनाच्या सर्वांना खूपखूप शुभेच्छा. या वेळेला मला खूप आनंद होतोय की, या वेळच्या महिला दिनाच्या निमित्ताने आम्ही 'बिइंग वुमन'चा अंक हा वेगळ्या स्वरूपात प्रकाशित करतो आहोत.

वर्ष १९०९ मध्ये महिला दिनाच्या या संकल्पनेचं बीज रोवले गेले आणि वर्ष १९११ पासून 'जागतिक महिला दिन' साजरा करायला सुरुवात झाली. वर्ष १९७५ पासून भारतातही जागतिक महिला दिन साजरा होऊ लागला.

मला असं वाटतं की, माझ्यासाठी आणि 'बिइंग वुमन'साठी 'महिला दिन' हा रोजच असतो. रोजचा दिवस तिचाच असतो. कारण रोज सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतची कामं, ऑफिस, घर सांभाळणं स्वत:चा बिझनेस सांभाळणं, त्यानंतर स्वत:चे छंद जोपासणं, प्रवासाला जाणार असेल तर ती तयारी करणे, या सर्व गोष्टी तिच्या सवयीच्या असतात.

आपण एक दिवस 'महिला दिन' साजरा करून वर्षभराची कसर भरून काढतो. सत्कार समारंभ, महिलांसाठी नवीन उपक्रम सरकार, बँका, सामाजिक संस्था या राबवत असतात. यातून नक्कीच गरजू महिलांना एक आधार मिळतो.

महिलांना दुय्यम स्थान द्यायचं नाही; म्हणजेच जर ती पुरुषांच्या इतकेच आणि त्याच जबाबदारीचे काम करत असेल, तर तिचा पगार पुरुषाच्या पगाराइतकाच असला पाहिजे, तिचे पद पण तेच असले पाहिजे. कोणत्याही क्षेत्रात महिला मागे नाहीत. एनडीएसारख्या संस्थेमध्ये पण मुलींना या वर्षी अ‍ॅडमिशन मिळते आहे. या परीक्षेत मुली चांगल्या गुणांनी पास झाल्या आहेत.

तर आजच्या दिवशी असं ठरवू या की, प्रत्येक स्त्रीला तिचा मान द्यायचा. तशी तर तिला कुणाच्या आधाराची गरज नाही. मोठमोठे उदयोग करणाऱ्या स्त्रिया पाहिल्या की हे कळतेच. मोठ्या हुद्यावर काम करणाऱ्या, जिथे नोकरी करतो त्या कंपनीला नंबर एक बनवण्यासाठी झटणाऱ्या, हॉस्पिटलमध्ये रात्रंदिवस काम करणाऱ्या, सॉफ्टवेअर कंपनीत अमेरिका-युरोप अशा वेळांच्या शिफ्ट्समध्ये काम करणाऱ्या स्त्रिया, घराकडे पण तेवढेच लक्ष देतात. अशा स्त्रिया आणखी अन्य स्त्रियांसाठी नोकऱ्या निर्माण करतात. घरी स्वैपाक करणे, घरकाम, मुलांना सांभाळणे अशा कामातून अजून नोकऱ्या निर्माण होतात. तयार पदार्थ विकणाऱ्यांना पण अशाच घरातून बिझनेस मिळतो. एक स्त्री नोकरी करत असेल किंवा व्यवसाय करत असेल तर तिच्यामुळे अजून नोकऱ्या निर्माण होतातच.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने 'बिइंग वुमन'चा हा अंक येतोय त्याचं शीर्षक 'मी उद्योगिनी' असं आहे. आपण अशाच उद्योगिनींची ओळख करून घेणार आहोत. पर्यावरण, वकिली, बँकिंग, स्पा आणि पार्लर, ट्रॅव्हल ब्लॉगर अशा वेगळ्याच क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या मुलाखती यात देत आहेत.

आत्तापर्यंत 'बिइंग वुमन'ने सर्व स्तरातल्या स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या आहेत. खूप कष्टातून वर आलेल्या, इंडस्ट्रियालिस्ट, बिझनेस करणाऱ्या, रेडिओ जॉकी, खासदार, आमदार, लेखिका या सगळ्यांनी हेच सांगितले की, 'तुम्हाला मल्टि टास्किंगचे वरदान आहे, त्याचा उपयोग करा.'

DCP पौर्णिमा गायकवाड म्हणाल्या होत्या की, 'मुलांना सांभाळून घराकडे बघणे आणि पोलिस अधिकाऱ्याची ड्युटी करणे हे स्त्रीच्या 'मल्टि टास्किंग' या गुणामुळे शक्य होते.'

आता कोविड कमी झाल्यानंतर या महिन्यात अजून एक मन खिन्न करणारी घटना म्हणजे रशिया-युक्रेन युद्ध चालले आहे. तेथे सामान्य नागरिकांच्या जिवाला धोका आहे. युद्धाचे पण काही नियम आहेत. यावर साऱ्या जगाने विचार करावा. महागाईने ग्रासलेल्या विकसनशील देशांना या युद्धाचा फटका बसतो आहे.जगाची थांबलेली इकॉनॉमी आता स्थिर होत होती. सर्वाकडून अशा युद्धाचा निषेध होतो आहे.

**- संपादक**



**आम्ही उद्योगिनी**

# मल्टीपल टास्कफोर्स म्हणजेच सीमान्तिनी नूलकर



**सीमान्तिनी नूलकर**

**टीम बिइंग वुमन :** व्यवसायाने वकील, एक संवेदनशील लेखिका, पर्यावरण कार्यकर्ती आणि लडाखच्या प्रेमात गुरफटलेली चित्रकार-कलाकार अशी सर्वस्पर्शी ओळख असलेल्या साताऱ्याच्या सीमान्तिनी नूलकर म्हणजे मल्टीपल टास्कफोर्स मॅनेजरच.

'बिइंग वुमन'शी बोलताना नूलकर सांगतात की, निसर्गप्रेमी वकिल आणि लेखिका अशी वेगवेगळी ओळख सांगता येणार नाही. निसर्गाची धूळधाण माणसानेच केली आहे. वकिली भाषेत निसर्ग aggrieved, injrued party आहे. निसर्गाचे म्हणून काही मूलभूत हक्क आहेत. त्यावर गदा आली आहे. त्यासाठी त्याची वकिल म्हणून बाजू plead करणं, लढवणं जरुरीचं आहे. आणि हे काम लेखनातून ही परिणाम कारक रित्या होऊ शकते. म्हणुन या तिन्ही भूमिका एकमेकांत गुंतलेल्या आहेत.

लदाखच्या जिवावर उर्वरित भारत सुखनैव रहातो आपण. पण त्याची जाण कोणाला नाही असं जाणवलं आणि आपले सैनिक सियाचेन सारख्या दुर्गम भागात प्राण पणाला लावत असतात पण त्या विषयीही म्हणावी तितकी आस्था नाही. या वीरांच्या भूमीबद्दल लदाखच्या अद्भुत निसर्गसौंदर्याबद्दल अनोख्या लोकसंस्कृतीबद्दल माहिती व्हायला हवी म्हणुन एक पुस्तक लिहायचं मनात आलं. लदाख असीम शांततेचा अनुभव देणारा निसर्गाशी आणि स्वत:शी संवाद घडवून आणणारा प्रदेश आहे. ते मी अनुभवलं. ते इतरांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न म्हणजे लडाख : भारताचा अद्भुत मुकुटमणी हे पुस्तक.

पूर्वी सीमंतिनी सातारा औद्योगिक क्षेत्रात प्रिसीजन टूल रूम हा व्यवसाय करत होत्या. खरं तर मुळात त्यांचे शिक्षण सूक्ष्म जीवशास्त्रात झाले आहे. पण कौटुंबिक गरज म्हणून त्या इंजिनियरींग व्यवसायात ओढल्या गेल्या. त्यावेळी ऑप्टीकल प्रोफाईल ग्राईंडर हे मशीन चालवणाऱ्या भारतातल्या हातावर मोजता येणाऱ्या लोकांपैकी सीमंतिनी एक होत्या.

सगळं एकटीच्या हिंमतीवर निभावून नेण्याची सीमंतिनीची जिगर दाद देण्यासारखीच आहे. मग इंजिनियरींग व्यवसाय सोडून त्यांनी वकीली व्यवसाय सुरू केला. या सगळ्या व्यापा-तापात निसर्गमैत्र सुरुच होते. कधीतरी कॉलेज जीवनात गढवाल, उत्तरांचल, हिमाचलच्या हिमशिखरांनी सीमंतिनीला खुणवायला सुरुवात केली आणि ट्रेक्सचा सिलसिला सुरू झाला. सीमंतिनीची निसर्गाबद्दलची आत्मीयता, निसर्गातल्या घटकांकडे पहाण्याचा दृष्टिकोन, आणि निसर्ग संवर्धन याविषयीचे विचार वेगळे आहेत.

साताऱ्याजवळ कासपठारावर अनोखी फूलं फुलतात, त्याचे सातारकर कित्येक पिढ्यांचे साक्षीदार आहेत. पण अलिकडे पर्यटनातल्या दुष्प्रवृत्तींमुळे कासचे सौंदर्य लयाला चालले आहे. त्यासाठी लोकांमध्ये अवेयरनेस वाढवायला हवा. या भावनेतून सीमंतिनीने लेखणी उचलून कासच्या फुलांच्या रंगसौंदर्याबद्दल, परागहस्तांतरण करताना फुलं करत असलेल्या करामतींबद्दल, लिहायला सुरुवात केली.

कॅन्सरसाठी काजव्यांच्या शरीरातल्या द्रव्याचा काहीएक उपयोग असतो. त्यासाठी काजवे मारले जातात. त्या निष्पाप काजुल्यांविषयी प्रेम वाटावं, वाढावं त्यांची हत्या टळाव्या, या भावनेतून मेढा-महाबळेश्वर घाटातल्या काजुल्याच्या झाडांबद्दल त्यांच्या पालख्यांबद्दल ही सीमंतिनीने लिहिले. निसर्ग संवर्धनाच्या दृष्टीने 'नागरी संशोधक' ही एक सीमंतिनीची आवडती संकल्पना आहे.

याबरोबरच कायदेविषयक लिखाण, व्याख्यानं, पुस्तकं याबरोबरच निसर्गविषयक लेखन, प्रवास वर्णन, ललित लेखनही सुरू होतं. स्त्रियांमध्ये सर्व प्रकारच्या कायद्यांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, कायद्यांची निदान जुजबी ओळख व्हावी, या उद्देशाने सीमंतिनीने अकथ कथा हे कायद्याची माहिती देणारे पुस्तक लिहिले. कौटुंबिक हिंसाचार कायद्याविषयीचेही त्यांचे पुस्तक प्रकाशित झालेले आहे. अकथ कथा या कथासंग्रहाला दोन पुरस्कारही मिळाले आहेत.

कायदेविषयक साक्षरता निर्माण व्हावी यादृष्टीने शाळा, कॉलेजस् आणि स्त्रियांचे ग्रुप्स् यामध्ये सायबर गुन्हे, मोबाईल अ‍ॅडीक्शन याविषयी व्याख्यानं आणि वाचन संस्कृती वाढावी म्हणून व्याख्याने आणि उपक्रम सुरू असतात.

साताऱ्याची निसर्ग-पर्यावरण क्षेत्रात कार्य करणारी जुनी, जानीमानी संस्था म्हणजे रानवाटा निसर्ग आणि पर्यावरण संवर्धन मंडळ या संस्थेशी सीमंतिनी २००६-०७ पासून जोडलेल्या आहेत. गेली दोन वर्षे संस्थेच्या अध्यक्षा आहेत.

सीमंतिनी यांनी लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशनच्या झोनल अ‍ॅडव्हायजरी बोर्डची मेंबर म्हणून काम केले आहे. पश्चिम महाराष्ट्रातली वकीलांची पहिली पतसंस्था डिस्ट्रीक्ट लॉयर्स को-ऑप क्रेडीट सोसायटीच्या त्या २५ वर्षांपासून, संचालक आहेत. या व्यतिरिक्त सहकारी संस्था, बँका, मासिके, फिल्मस् यांच्या सल्लागार मंडळावरही त्या आहेत. तिचा सातारा नगर परिषदेने सन्मानपत्र देऊन गौरव केला आहे. कै. भाऊ दाजी ट्रस्ट, रोटरी इंटरनॅशनल २०१८ इ. पुरस्कार तिच्या सामाजिक कार्यासाठी मिळाले आहेत.

# फोर फौंटन डीस्ट्रेस स्पाच्या रत्ना कुलकर्णी

आम्ही उद्योगिनी




**टीम बिईंग वुमन :**

खरे तर सौंदर्याची व्याख्या प्रत्येकाची आपली वैयक्तिक असली तरी सुंदर असणे, दिसणे आणि राहणे हे सगळ्यांनाच आवडते किंबहुना ती आजच्या काळाची गरज बनली आहे. आधुनिक युगाची ही गरज ओळखून प्रसिद्ध उद्योजिका रत्ना कुलकर्णी यांनी २०१३ साली आपल्या सलून आणि स्पा या व्यवसायाला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी एका प्रसिद्ध ब्युटी सलोन ब्रँडची फ्रँचायझी घेतली  आणि फोर फौंटन डीस्ट्रेस स्पा पण सुरू केले. सुरुवातीला हा व्यवसाय त्यांनी भागीदारीत सुरू केला होता.

खरे तर २०१७ पर्यंत फ्रँचाईजी स्वरूपात असणारा हा व्यवसाय खूप छान नाव रूप घेऊ लागला होता, प्रगती करु लागला होता. पण प्रत्येक व्यवसायामध्ये येणारे चढउतार इथेही आले. त्याचा परिणाम रत्ना मॅडमच्या व्यवसायावर झाला आणि त्यांना ब्युटी सलूनचा व्यवसाय थांबवावा लागला. अर्थात ही काही क्षणांची विश्रांती होती कारण नंतर २०१८-१९ मध्ये त्यांनी स्वतःचे ले मिरर सलोन अँड स्पा हा ब्रँड सुरू केला. यावेळी रत्न मॅडमनी खूप विचार करून तयारीनिशी निर्णय घेतलेला असल्यामुळे त्यांना सुरुवातीपासूनच चांगले यश मिळाले. जुन्या सोडून गेलेल्या हुशार आणि कार्यक्षम कर्मचाऱ्यांना परत बोलावले. या कर्मचाऱ्यांनी पण रत्ना मॅडमना साथ दिली आणि खूप छान प्रगती करू लागले.

ह्यावेळी संपूर्ण जगावर परिणाम केलेल्या महामारीने ले मिरर सलोनलासुद्धा सोडले नाही, लॉकडाऊनमुळे काही काळ व्यवसाय बंद ठेवावा लागला पण रत्ना मॅडमने हा संपूर्ण वेळ स्वतःच्या व्यवसायाचे गोल ठरवणे, त्याचे पुढचे प्लॅन करणे, त्याबद्दल नवीन वेगवेगळे ऑनलाईन कोर्स करणे असा सत्कारणी लावला त्याचा उपयोग त्यांना लॉकडाऊन नंतर आपला व्यवसाय अजून कसा वाढवता येईल यासाठी झाला. ह्याच वेळी रत्ना मॅडमने काही परदेशी संस्थांकडून स्पा आणि सलून कोचिंग चे ऑनलाइन कोर्सेस  केले. त्यामध्ये आपला स्पा आणि सलून व्यवसाय एका सिस्टीम मध्ये एका प्रोसेस मध्ये कसा चालवता येईल याचे प्रशिक्षण घेतले.

एखाद्या व्यवसायात सगळी काम करायला फक्त तिथले मालक नसतात तर योग्य, प्रामाणिक कुशल कर्मचारी पण असतात किंबहुना त्यांना तसे प्रशिक्षण देऊन कुशल करावे लागते तेव्हाच मालकाचे आणि कर्मचारी यांचे त्या व्यवसायातील गोल एक होतील आणि तो व्यवसाय पुढे जाईल नेमके हेच रत्ना मॅडम यांनी पुढील पाच वर्षात आपला व्यवसाय किती आणि कसा प्रगत करायचा आहे ह्या गोलवर त्यांनी आणि त्यांच्या संपूर्ण टीमने काम करायला सुरुवात केली आणि आज Le miroir एक ब्रँड म्हणून सगळीकडे प्रसिद्ध आहे.

जेव्हा स्वतःच्या व्यवसायात या सगळ्या संकल्पना यशस्वी झाल्या तेव्हा त्या आता ज्या सलून स्पा व्यावसायिकांना आपला व्यवसाय एक ब्रांडमध्ये रुपांतरीत करायचा आहे त्यांना तसे कोचिंग देतात. यामध्ये आधीपासून सलून  स्पाचा स्वतःचा व्यवसाय करणारे किंवा हा व्यवसाय करु इच्छिणारे असे दोन्ही उद्योजक येतात. तुमच्या व्यवसायाचे लोकेशन कसे असावे, तुमच्या व्यवसायाच्या ठिकाणी तुमचे इंटेरियर तसेच तुमच्या व्यवसायाचे नेम बोर्ड कसे असावेत, कुशल स्टाफ कसा तयार करावा त्यांना त्यांच्या कामाची, जबाबदाऱ्यांची वाटणी कशी करावी तसेच व्यवसाय मालकाने काय जबाबदाऱ्या सांभाळाव्यात, व्यवसायातील इन्व्हेंटरी मॅनेजमेंट कशी असेल, सर्विस कशी असावी, तुमचा ग्राहक तुमचा समाधानी ग्राहक कसा होईल, तुमच्या ग्राहकांचा संपूर्ण अभ्यास कसा करायचा, आधुनिक भाषेत तुमचा सीआरएम कसा सांभाळायचा हे सगळे त्या कोचिंग मध्ये घेतात.

हे कोचिंग ऑनलाईन आणि ऑफलाईन असे दोन्ही पद्धतीने असते सलून आणि स्पा व्यवसाय करणारे किंवा करायला उत्सुक असणाऱ्या सगळ्यांना या व्यवसायाचा ३६० अंशामध्ये कोचिंग त्या करतात. या व्यवसायाचे आर्थिक व्यवहार कसे सांभाळावे हेसुद्धा त्यांचा कोचिंगचा एक भाग आहे  तुमच्या व्यवसायाचे मार्केटिंग कसे करावे याचेसुद्धा कोचिंग त्या करतात.

भविष्य काळात त्यांना फ्रँचाईजी देण्याचा मानस आहे आणि हे फ्रँचाईजी घेतील त्यांना आधी रत्ना मॅडमचे संपूर्ण कोचिंग घेणेसुद्धा आवश्यक राहणार आहे. रत्ना मॅडमचे विशेष गुण लक्षात म्हणजे, त्यांना त्यांच्या व्यवसायासंदर्भात सतत काहीतरी नवीन शिकत राहायला आवडते, त्यांना त्यांच्या ग्राहकांना काहीतरी नवीन अनुभव द्यायला आवडते, त्यांच्या ल मिरर च्या संपूर्ण टीम मध्ये त्या स्वतः सगळ्या गोष्टी व्यवस्थित फॉलो करतात म्हणून त्या उत्तम लीडर बनू शकल्या आहेत आणि यामुळेच रत्ना मॅडमच्या कोचिंग मध्ये तयार होणारे व्यवसायिक पण याच पद्धतीने आपल्या व्यवसायाचा ब्रँड बनवण्यासाठी यशस्वी झाले आहेत आणि होत आहेत.

सगळ्या वाचकांना व्यावसायिकांना रत्ना मॅडम एक विचार खूप मार्गदर्शक ठरेल, तो म्हणजे मला सगळं माहिती आहे या अहंकारामध्ये न राहता मला सतत शिकायचे आहे या मानसिकतेने व्यवसाय करावा 'बिइंग वुमन'तर्फे रत्ना कुलकर्णी मॅडम आणि ल मिरर सलून आणि स्पा च्या संपूर्ण टीमला खूप खूप शुभेच्छा.

# ट्रेजर्ड हॉलीडेजच्या संचालक राधिका नवरे



**डॉ. मेदिनी डिंगरे**

हस्तकला आणि हातानी विणलेल्या वस्त्रांच्या जगतात मुशाफिरी करणारी उद्योगिनी ट्रेजर्ड हॉलीडेजची संचालिका म्हणजे राधिका नवरे होय.

राधिकाने आपला उद्योग निर्माण करण्यासाठी एक सुंदर क्षेत्र निवडलं आहे ते म्हणजे पारंपरिक कलेचा वारसा जोपासणाऱ्या वस्त्रांना प्रवास सहलींच्या माध्यमातून प्रकाशात आणण्याचं.

बीसीएलमध्ये रिलेशनशिप मॅनेजर आणि आयटी कंपनीमधल्या दमदार अनुभवांतून शिकत, समृद्ध झालेल्या राधिकाने, प्रवास आणि निसर्गाची आवड असल्यामुळे नोकरीला गुडबाय करत स्वतःची वेगळी वाट निवडली. रोटरीच्या माध्यमातून भारताची सांस्कृतिक दूत म्हणून अमेरिकेत वास्तव्य करण्याचा अनुभव तिच्या पाठीशी होताच. आता तिला ओढ लागली होती ती अस्सल भारतीय संस्कृती जाणून घेण्याची.


त्यासाठी तिने भारताच्या ग्रामीण भागातील पारंपरिक कलांचा मागोवा घेण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यात भटकंती करत वस्त्रकलेचा वारसा जपणाऱ्या अनेक ठिकाणांना भेटी दिल्या, अगदी सार्वजनिक वाहनातून प्रवास करत सोलोट्रिप्स केल्या. वस्त्र विणकरांच्या घरी वास्तव्य करत त्यांची कला जाणून घेत पुष्कळ संशोधन केले.

दक्षिण भारत, महाराष्ट्रातले पैठण, गुजरात तसंच ईशान्य भारतातील  वस्त्र विणकरांची अस्सल माहिती मोठ्या कष्टाने गोळा केली. अशी सगळी जय्यत सिध्द्ता करुन वस्त्र कलांचा प्रत्यक्ष अनुभव देणाऱ्या सहली आयोजित करणारी ट्रेजर्ड हॉलीडेज ही स्वतःची कंपनी सुरु केली.





आम्ही उद्योगिनी



सुंदर निसर्गसंपन्न भारतात विविध हस्तकला आणि वस्त्रसंस्कृतीचा मनोहर खजिनाच दडलेला आहे. त्याचा शोध घेण्याची आणि चाकोरीबाहेरचे पर्यटन करण्याची  आवड असलेल्या जिज्ञासू, निसर्गप्रेमी मंडळींसाठी ही कंपनी सुंदर सहली आयोजित करते.

यात सहभागी होणाऱ्यांना वस्त्र कलाकारांच्या घरी जाऊन हातमाग, रंगकाम, विणकाम आणि छपाईच्या  संपूर्ण प्रक्रियेचा संपन्न अनुभवत घेता येतो. शिवाय प्रत्यक्ष कलाकारांकडून कलावस्तूंची थेट खरेदी आणि मनसोक्त फोटोग्राफी करता येते.

कोणतीही घासाघीस न करता होणाऱ्या भरपूर खरेदीमुळे स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळे या सहली, कलाकार आणि प्रवासी या दोहोंसाठी लाभदायक ठरतात. तीनशेपेक्षा जास्त कलाकारांना तिने जोडून घेतले आहे आणि चोखंदळ पर्यटकांसाठी ४० विविध सहलींचे आयोजन केले आहे.

प्रत्येक सहलीचे विशेष नियोजन ती करते आणि त्यात सातत्याने नावीन्य आणले जाते. महाराष्ट्रातल्या  पैठणी, वारली, डौलदार करवती किनार साड्यांचे ट्रेल्स, कच्छ प्रांतातील वस्त्र परंपरा, कर्नाटकातील सुंदर हंपी, राजस्थानातील आश्चर्यकारक ब्लॉक पेंटिंग, हिमाचल मधील किन्नौर, ओडिशा मधील अस्सल आदिवासी कला परंपरा, मध्य प्रदेशातील नर्मदेच्या परिसरातील हातमाग आणि छपाईची खासियत, तमिळनाडूमधील कावेरी आणि विमुक्त जनजातींचे कलाविश्व अशा समृद्ध वस्त्र परंपरेचा मागोवा या सहलींमधून घेतला जातो. अशा नावीन्यपूर्व प्रयत्नांमुळे लोप पावणाऱ्या वस्त्रकलेला उर्जित अवस्था प्राप्त होत आहे.

इलकल या शंभर टक्के सुती वस्त्रांचे पुनरुज्जीवन करण्याच्या कामी राधिकाने सक्रिय हातभार लावला आहे. एका विणकर कुटुंबाला तिने व्यवसायात परत आणायचे मोठे काम केले आहे. सुती कापड निसर्गस्नेही असल्यामुळे ते वापरणे पर्यावरणपुरक ठरते.

मनमोहक वस्त्रांच्या विविधरंगी विश्वात सफर घडवणाऱ्या या उद्योगजीकेची सामाजिक सांस्कृतिक जाणीव आणि पर्यावरणीय बांधिलकी देखील जागृत आहे. म्हणूनच तिचा हा अनोखा आणि  विविधरंगी उद्योग कौतुकास्पद आहे.



आम्ही उद्योगिनी

# पर्यावरण रक्षणातील आघाडीचे नाव विनिता आपटे

**टीम बिईंग वुमन :**

Environment is not asking us to conserve her for her but for our future generations

ज्यांना या वरील वाक्याचा अर्थ समजला ते हे वाक्य आणि त्याचा अर्थ जगले वागले आणि संपन्न झाले आजच्या लेखात आपण अशाच एका संपन्न व्यक्तिमत्त्वाची ओळख करून घेणार आहोत. डॉ सौ. विनिता आपटे. TERRE POLICY CENTRE (Technology, Education, Research Rehabilitation for the Environment) ह्या NGO च्या संस्थापिका TERRE म्हणजे पृथ्वी आणि संस्थेच्या मार्फत होणारे कार्य पण पृथ्वीला जपण्याचे होते. खरे पाहता विनिता मॅडम या बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकरी करत होत्या याबरोबरच त्या अभिनय, टीव्ही प्रोग्राम अशा अनेक क्षेत्रात आवड म्हणून कार्यरत होत्या पण मुळातच लहानपणापासून सामाजिक कार्यात वाहून घेण्याच्या वातावरणात वाढल्यामुळे आत एक पिंड होता जो अशीच संधी शोधत होता आणि त्याच वेळेस त्यांना एक संधी चालून आली. पॅरिसमध्ये युनायटेड नेशन्स इन्व्हायरमेंट मध्ये काम करण्याची संधी मिळाली होती. विनिता मॅडमने या संधीचे सोने केले खरे पण त्या आपल्या भारत देशाशी असलेल्या प्रेमामुळे आणि कौटुंबिक जबाबदारी या दोन्ही शी तनाने आणि मनाने बांधलेला होत्या म्हणून काही वर्ष पॅरिसमध्ये काम करून परत भारतात. याच दरम्यान त्यांनी TERRE ची स्थापना केली होती साधारण २०१२-१३साली त्यांनी संपूर्णपणे संस्थेसाठी स्वतःला वाहून घेतले. पर्यावरणाबद्दल सगळ्यांच्या मनात जागरूकता होती पण काम कोणी केलेले नव्हते यावेळी त्यांनी आपल्या संस्थेमार्फत अर्बन फॉरेस्ट म्हणजे जंगले वाढवण्याचा, झाडे लावण्याचा संकल्प केला. यासाठी त्यांनी सुरुवातीला विविध कंपन्यांना प्रपोजल पाठवून संपर्क करायला सुरुवात केली. वारजे जवळ एक टेकडी त्यांना मिळाली त्यावर त्यांनी प्रोजेक्ट करायला सुरुवात केली तत्कालीन पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांचा या कामात महत्वाचा वाटा होता. सर्वप्रथम टाटा मोटर्स कंपनीने या प्रोजेक्ट मध्ये सहभाग दाखवला. या प्रोजेक्टमध्ये फक्त झाडे लावणे हेच नाही तर जगवण्याची पूर्ण जबाबदारी पण त्या आणि त्यांची टीम घेतात. पुण्यातील Persistence ही कंपनीसुद्धा त्यांच्याबरोबर आजतागायत जोडून आहे.. हे सगळे करताना चांगले आणि तितकेच वाईट अनुभव त्यांना आले अलिबाग जवळ एका कंपनीकडून त्यांना असा वाईट अनुभव आला होता. यामध्ये कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना सहकार्य न करता खूप त्रास दिला. पैसे देण्यासाठी टाळा टाळ, सतत नियमांवर बोट, जंगल खात्यातल्या लोकानी पण टीमला अटक करणे, चुकीच्या गोष्टींसाठी दंड लावणे, या सगळ्यात जवळपास पंधरा-वीस लाखाचे आर्थिक नुकसानही त्यांना सहन करावे लागले. अर्थात हे सगळे करताना त्यांनी आपल्याला शिकायलाच मिळते आहे या दृष्टिकोनातून या पाहात काम करत राहिल्या आणि त्यामुळे त्यांना पुढची कामं फार सोपी झाली असेच त्या म्हणतात.

TERRE Policy Centre कडून चालणारे अजून एक कार्य म्हणजे Environment Education TERRE OLYMPID हा शाळा तसेच कॉलेज मधल्या मुलांसाठी एक ऑनलाइन स्पर्धात्मक प्रोजेक्ट चालवतात.यामध्ये तीन ते चार लाख मुलं सहभागी आहेत तसेच डॉक्टर कलाम फेलोशिप प्रोजेक्ट १८ ते २५ वयोगटातील मुलांना पंचवीस हजार रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र देतात. या दोन्ही प्रोजेक्टमध्ये अनेक गरजू तसेच हुशार विद्यार्थी घडवले जातात आणि त्यांच्या बुद्धिमत्तेला प्रगट होण्याचा वाव मिळतो. तसेच लहान मुलांना बैठे खेळ खेळण्याची आवड लागावी म्हणून तसेच त्यातून पर्यावरण पूर्वक शिक्षण मिळावे म्हणून TERRE टीमने सापशिडी आणि नवा व्यापार यासारखे प्लेइंग विथ लर्निंग हे खेळ इन्व्हरमेंट लर्निंग या संकल्पनेने तयार केले आहेत. अतिशय अल्प किमतीमध्ये उपलब्ध आहेत तसेच विविध शाळांमध्ये मुलांसाठीही ते उपलब्ध करून देत आहेत. याच बरोबर पत्रकारांसाठीसुद्धा काही स्कॉलरशिप ठेवले आहेत, जे पत्रकार एन्व्हायरमेंटबद्दल चांगले लिहितात, अशांना या स्पर्धेमध्ये सहभागी होता येते

आपल्या भारतात पर्यावरणाबद्दल जागृती असणारे बरेच जण होते पण प्रत्यक्ष कार्य करणारे कमी होते. आपल्या देशातील ही कमतरता जाणून २००५मध्ये विनिता मॅडमने परदेशातील म्हणजे युनायटेड नेशन एन्व्हार्यमेंट प्रोग्राम Paris येथे लहान मुलांसाठी पर्यावरण विषयक अभ्यास करण्यासाठी असणारे बरेच पब्लिकेशन्स होते ते त्यांनी भारतात आणली आणि त्याचे मराठी, हिंदी, उर्दू, बंगाली अशा रिजिनल भाषांमध्ये भाषांतर केले. त्याचे ऑडिओ व्हिडिओ फिल्म तयार केल्या आणि पर्यावरण विषयक जागृती साठी एक मोठी सुरुवात केली. आज भारत देशात पर्यावरण विषयक जागृती होण्यासाठी विनितामॅडम यांचा खूप मोठा हातभार आहे. त्या म्हणतात हे सगळे करताना झाडांबद्दलची सर्वांगीण माहिती त्यांना शिकायला मिळाली, कोणते झाड कुठे चांगले लागू शकते आणि कुठे चांगले वाढेल हेही त्या खूप छान सांगतात.

जेव्हा संपूर्ण जग पर्यावरणाचे महत्त्व समजू लागला आहे, ऑक्सिजन मिळवण्याच्या मागे लागला आहे तेव्हा या परिस्थितीची जाणीव विनिता मॅडमना कदाचित फार आधीच झाली होती म्हणून त्यांनी आधीपासुनच पर्यावरणासाठी काम करायला सुरुवात केली असावी त्यांच्याशी बोलताना त्यांच्या कडून खूप छान संदेश आपल्या सगळ्यांसाठी मिळाला मळलेल्या वाटांवर चालण्यापेक्षा नवीन वाटेवर चालून आपल्या पाऊल खुणा निर्माण करणे कधीही चांगलेच. विनिता मॅडम आणि TERRE सेंटरच्या सर्व टिमला बिइंग वुमन आणि वाचकांकडून अनेक शुभेच्छा.

---


फॉर्म ४

वृत्तपत्राच्या मालकीहक्कासंबंधीचे निवेदन (दर मार्च महिन्यात प्रसिद्ध करावयाचे)

| | |
|---|---|
| १) नियतकालिकाचे नाव | : बिइंग वुमन |
| २) प्रकाशन स्थळ | : फ्लॅट नं. ११, संगीता सोसायटी, ताडीवाला रोड, पुणे, महाराष्ट्र-४११००१ |
| ३) प्रकाशन काल | : पाक्षिक |
| ४) मुद्रकाचे नाव | : रोहिणी अरुण वांजपे |
| राष्ट्रीयत्त्व | : भारतीय |
| पत्ता | : फ्लॅट नं. ११, संगीता सोसायटी, ताडीवाला रोड, पुणे, महाराष्ट्र-४११००१ |
| ५) प्रकाशकाचे नाव | : रोहिणी अरुण वांजपे |
| राष्ट्रीयत्त्व | : भारतीय |
| पत्ता | : फ्लॅट नं. ११, संगीता सोसायटी, ताडीवाला रोड, पुणे, महाराष्ट्र-४११००१ |
| ६) संपादक | : रोहिणी अरुण वांजपे |
| राष्ट्रीयत्त्व | : भारतीय |
| पत्ता | : फ्लॅट नं. ११, संगीता सोसायटी, ताडीवाला रोड, पुणे, महाराष्ट्र-४११००१ |
| ७) मुद्रणस्थळ | : एकविरा पब्लिसिटी, ए-१२, निखिल पार्क सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे - महाराष्ट्र- ४११०५१ |
| | : |
| ८) वृत्तपत्राची मालकी/ स्वामित्त्व इ. चे नाव | : रोहिणी अरुण वांजपे |
| कार्यलयाचा पत्ता | : |

मी रोहिणी अरुण वांजपे, घोषित करते की, वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे.

दिनांक : १ मार्च २०२२

प्रकाशक


# स्ट्रेसला टाळा; निरोगी आयुष्य जगा




**डॉ. नूपुर जोगळेकर**
MBBS
Shamanic healer
(Certified from US )
REBT Practitioner
Flower remedy therapist
Available for appointments at
**9890053837**





'मला तुम्ही प्लीज मदत करा. मला खूप भीती वाटते. कसेतरी होते. काही सुचत नाही. पटकन रडायला येते,' असं पहिल्या वेळी भेटल्यावर २८ वर्षांची नेहा म्हणाली.

नेहाला घराबाहेर पडायची खूप भीती वाटायची. 'कोरोनामुळे मी किंवा माझ्या घरातली माणसे यांच्या जीवाला धोका आहे. बाहेर पडलो तर नक्की काहीतरी वाईट होईल. असे ती नेहमी म्हणायची. जसे आमचे थेरपी सेशन्स पुढे गेले, तसे माझ्या हे लक्षात आले की तिला मृत्यूची प्रचंड भीती वाटायची. त्याचे कारण म्हणजे ती शाळेत असताना तिचे वडील कॅन्सरने गेले. वडील जाण्याचे दु:ख ११ वर्षांच्या नेहाला मुळीच सहन झाले नाही.

तर थोडं आपण नेहाच्या बाजूने विचार करूयात. ज्या वयात मुली अभ्यास करणे, खेळणे, नटणे- मुरडणे या गोष्टींमधये रमतात, त्या वयात नेहा आता आई घरी नसली की घराकडे लक्ष देणे, धाकट्या भावाकडे लक्ष देणे या जबाबदाऱ्या सांभाळू लागली. आपण परफेक्ट आयुष्य जगलो पाहिजे, आई दुखावली जाईल असे नाही वागले पाहिजे, बाबा असते तर त्यांना अभिमान वाटेल असे शिक्षण मिळवले पाहिजे असे समज नेहाने करून घेतले. 'बाबा असते तर नातेवाईक, शाळेतील मित्र - मैत्रिणी, शेजार-पाजारचे लोक आमच्याशी नीट वागले असते. इतका त्रास दिला नसता,' असे तिला वाटू लागले.

तर या सगळ्यामुळे तिचे लहानपण हरवले. तिला कधी कोणाशी मोकळेपणाने बोलता आले नाही. कुठलीही वाईट बातमी कानावर आली की तिला भीती वाटू लागली. पोटात गोळा येणे, मळमळणे, छातीत धडधड होणे अशीही लक्षणे दिसू लागली. इतर एखाद्या व्यक्तीला झालेला आजार आपल्यालाही होणार अशी दहशत ती मनात बाळगू लागली. ही सगळी anxiety आणि panic attacks ची लक्षणे तिच्यात दिसू लागली. घरी मात्र याविषयी कोणाला फारसे माहीत नव्हते. लोकांना तिचे वागणे विचित्र वाटू लागले. ती एक कमकुवत आणि लाडावलेली मुलगी आहे असा तिच्याबद्दल घरी समज झाला.

त्यात घरी मुला-मुलींना समान वागणूक नव्हती. खूप स्पर्धेचे आणि तुलनेचे वातावरण होते. आपण कणखर व्हायचे. हे anxiety वगैर मनाचे खेळ आहेत, त्याकडे लक्ष द्यायचे नाही असे तिला सतत सांगितले गेले. त्याने तिचा आत्मविश्वास अजून खालावला. तिला तिचे परदेशी शिकण्याचे स्वप्न पूर्ण होईल की नाही अशी शंका वाटू लागली.

एक मुलगी या वयात लग्नाचा, संसाराचा विचार सोडून उच्च शिक्षणाबद्दल कसा विचार करू शकते हे तिच्या घरी कोणाला कळेना. 'परदेशी असं काय वेगळं शिकायला मिळणार? त्यापेक्षा आहे ती नोकरी करत लग्न झाले तर सगळे कसे वेळेत होईल,' असे ही तिला सुनावले गेले.

ती मला भेटली तेव्हा प्रचंड गोंधळलेली होती. काय करावे तिला कळत नव्हते. अनेक गोष्टींचे तिच्या मनावर दडपण होते. आपण कधीही आनंदी आणि यशस्वी होणार नाही असाही तिचा समज झाला होता.

जशी आमची सेशन्स अजून पुढे गेली तशी ती मोकळेपणाने बोलू लागली, खूप रडली, मोकळी झाली आणि मग हळूहळू दिलखुलासपणे हसूही लागली. हा काही दिवस किंवा आठवड्यांचा नाही, तर ९ महिन्यांचा तिचा प्रवास होता.

नंतर ती परदेशी गेली व पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे तिचे स्वप्नं पूर्ण होऊ लागलं. तिचा आत्मविश्वास वाढू लागला. पळशीं कमी झाली. वाटणारी भीती आता तिला आयुष्यात पुढे जाण्यापासून थांबवत नाही. खऱ्या अर्थाने 'जागतिक महिला दिन' म्हणून नेहा सारख्या घरातील लोकांच्या, समाजाच्या विरोधात लढणाऱ्या, खऱ्या अर्थाने स्वतंत्र वृत्तीच्या खंबीर मुलींना सलाम!




Regd. Newspaper - RNI No. MAHMAR/2019/78753
(Decl. No. SDM/Pune City/SR/30/2020)
Licence to post without pre-payment of postage No.
Postal Reg. No.
Publication Date: 01/10/2021
Posting ‘Every Fortnight’ at

To,

‘बिइंग वुमन’ हे पाक्षिक मालक, प्रकाशक व मुद्रक रोहिणी अरुण वांजपे यांनी एकविरा पब्लिसिटी, ए १२, निखिल पार्क ‘सी’ सोसा., माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे ४११०५१ येथे छापून फ्लॅट नं. सी ११, संगीता सीएचएस, ताडीवाला रोड, पुणे ४११००१ येथून प्रसिध्द केले.
संपादक-रोहिणी अरुण वांजपे (प्रसिद्ध केलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
“Being Woman’ Fortnightly publication is owned, Printed and Published by Rohini Arun Wanjpe, printed at Ekvira Publicity, A 12, Nikhil Park 'C' Soc., Manikbaug, Sinhgad Road, Pune-411051 and published at Flat No. C11, Sangita CHS, Tadiwala Road, Pune 411001. Editor - Rohini Arun Wanjpe.

